Sinhgad Institutes

Sinhgad Technical Education Society's

# SINHGAD SPRING DALE SCHOOL

(Recognised by Govt. of Maharashtra)
Index No. : 11.05.077
S. No. 19/15, Erandavna, Smt. Khilare Mark, Off Karve Road, Pune - 411 004.
**Tel. :** 020 - 2543 4301 / 02 E-mail : principal.ssdsn@sinhgad.edu Website : www.sinhgad.edu

Prof. M. N. Navale
M.E. (ELECT.), MIE, MBA
**FOUNDER - PRESIDENT**

Dr. (Mrs.) Sunanda M. Navale
B.A., M.P.M., Ph.D.
**FOUNDER - SECRETARY**

Mrs. Nirmala Sapkal
**Principal**

Ref. : SSDS/E /2025-26/02 Date : 28/ 04 / 20 25

प्रती

मा. शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)

पुणे जिल्हा परिषद, जि. पुणे

विषय – नमुना २ साठी छायांकित प्रतीचा स्वीकार करणेबाबत......

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार सिंहगड स्प्रिंग डेल स्कुल, एरंडवणे या शाळेचा शैशाणिक वर्ष २०२५-२०२८ साठी बालकाच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांचा नियम ११, पोट नियम (४) अन्याये शाळा स्वमान्यता (नमुना २) साठी आपल्या इ मान्यता प्रणाली मार्फत सदरचा प्रस्ताव दाखल करित असून सदर मान्यता साठी लागणारी कागद पत्रे हि छायांकित प्रती मध्ये अपलोड करीत आहे.

सदर प्रस्तावासोबत जोडलेले आहे सर्व कागद पत्रे हे वैध मार्गाने मिळवलेले आहेत व सर्व कागद पत्रे सत्य आहेत याची मी हमी देतो. सदरील शाळा अथवा संस्था हि कोणताही अनधिकृत शाळा अथवा वर्ग चालवत नाही. हि शाळा किंवा संस्था सर्व शासकीय नियमाचे पालन हे जबाबदारीपूर्वक करीत आहे. शाळा मान्यता अथवा संस्था व्यवस्थापन यांचे संदर्भात न्यायप्रविष्ट बाब नाही याचीही मी हमी देत आहे. भविष्यात या संदर्भात विसंगती अथवा चुकीची व खोटी कागद पत्रे दिल्याचे निदर्शनास आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापिका म्हणून माझी व संस्थेची राहील याची मला जाणीव आहे व होणाऱ्या कायादिशीर परिणामास मी जबाबदार राहील.

सदर कागदपत्राची मूळप्रत मिळत नसल्यामुळे किंवा नजर चुकीने गहाळ झाल्या कारणास्तव हि सत्यप्रत जोडत आहे तरी याचा स्वीकार करावा हि विनंती.

कळावे.

आपली विश्वासू,

Sapkal

मुख्याध्यापिका

PRINCIPAL
Sinhgad Spring Dale School
Erandvane, Pune - 411 004.

(2) copy

कायम विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान तत्वावर~~

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/२००१/०२/०३ 1250-68
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 19 JAN 2004

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ. पुणे.

विषय : सन २००२- २००३ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी )

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/१००२ (४२२ /२००२)/प्राशि-३, दिनांक २०/५/२००२

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

उपरोक्त बाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या समोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००२ पासून इ. १ ली च्या वर्गास फक्त सन २००२-०३ या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटी पूर्ण करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.~~ सदर संस्थेच्या माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे. | न-हे, ता. हवेली, जि. पुणे. **कायम विना अनुदान** | १ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटीवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील [illegible]

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये निकोप शिस्त निर्माण करणे, तसेच नतीशीलपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा. असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/~~शिक्षण समितीची~~ मान्यता मिळताच त्यांची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. मा सचिव/अध्यक्ष, सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे.
-----------------------------------,
-----------------------------------,
-----------------------------------.